# वृत्तपत्र सुचना

राजीव गांधी प्लायओव्हर ब्रिज, अंधेरी (पश्चिम) वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेनंतर वाहतुक व रहदारी सुरळीत चालू रहावी व जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून खालील नमूद प्रमाणे वाहतुक मार्गात बदल करण्यात येत आहेत.

**१) एस व्ही. रोड, राजीव गांधी जंक्शन :—**

**अ) एस. व्ही. रोड, राजीव गांधी जंक्शन ( दक्षिण वाहिनी) :—**
राजीव गांधी प्लायओव्हर ब्रिज वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेनंतर अंधेरी रेल्वे स्थानकाकडून येणारे वाहतुकीसाठी विलेपार्ले येथे जाणेकरीता सरळ, गोखले ब्रिजकडे जाणेकरीता डावे वळण, जे. व्ही. पी. डी. कडे जाणेकरीता उजवे वळण सुरू करण्यात येत आहे.

**ब) एस. व्ही. रोड, राजीव गांधी जंक्शन (उत्तर वाहिनी) :—**महिला मंडळ जंक्शनकडून येणारे वाहतुकीसाठी अंधेरी रेल्वे स्थानकाकडे येण्याकरीता सरळ, जे. व्ही. पी. डी कडे जाणेकरीता डावे वळण व गोखले ब्रिजकडे जाणेकरीता उजवे वळण सुरू करण्यात येत आहे.

**क) गोखले ब्रिज :—** गोखले ब्रिजवरून विलेपार्लेकडे जाणारे वाहतुकीसाठी डावे वळण, जे. व्ही. पी. डी येथे जाणेकरीता सरळ मार्ग व अंधेरी रेल्वे स्थानकाकडे जाणेकरीता उजवे वळण सुरू करण्यात येत आहे.

**ड) सी. डी. बर्फिवाला रोड :** सी. डी. बर्फिवाला रोडकडून अंधेरी रेल्वे स्थानकाकडे जाणारे वाहतुकीसाठी डावे वळण, गोखले ब्रिजकडे जाणेकरीता सरळ मार्ग व एस. व्ही. रोडकडे येण्याकरीता उजवे वळण सुरू करण्यात येत आहे.

**२) एस. व्ही. रोड, महिला मंडळ जंक्शन :—** बर्फिवाला लेनकडून लल्लुभाई पार्ककडे जाणेकरीता सरळ, राजीव गांधी जंक्शनकडे जाणेकरीता डावे वळण व इर्ला जंक्शनकडे जाणेकरीता उजवे वळण सुरू करण्यात येत आहे.

**३) बर्फीवाला लेन दुतर्फा वाहतुकीकरीता खुली करण्यात येत आहे.**

**४) बर्फीवाला जंक्शन (बर्फीवाला लेन दुतर्फा वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याने ) :—** कुपर हॉस्पिटलकडून येणाऱ्या वाहतुकीला बर्फीवाला लेनकडे जाणेकरीता उजवे वळण, सुजय हॉस्पिटल जंक्शनकडून (गुलमोहर रोड) येणारे वाहतुकीला बर्फिवाला लेनकडे जाणेकरीता डावे वळण सुरू करण्यात येत आहे.

**५) बी. एम डब्ल्यू जंक्शन :—** आझाद लेनकडून येणारे वाहतुकीस अंधेरी रेल्वे स्थानक/गोखले ब्रिजकडे जाणेकरीता डावे वळण घेउन टिपू सुल्तान जंक्शन येथे यु टर्न उपलब्ध राहिल तसेच उपासना लेनकडून व जुहू गल्लीकडून येणारे वाहतुकीला सुजय हॉस्पिटल येथे जाणेकरीता उजवे वळण बंद असल्याने डावे वळण घेउन राजीव गांधी ब्रिजखाली यु टर्न घेता येईल.

Sd/-
( अनु भित्रे )
पोलीस उप आयुक्त (पश्चिम उपनगरे),
वाहतूक पोलीस मुख्यालय, मुंबई